# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६१९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२७/०९/२०१६

**१) ट्रक चालकाने सायकलला धडक दिल्याने तरुणीला जखमी केले . :—**

दिनांक २६/०९/२०१६ चे १०.०० वा. दरम्यान. यातील आरोपी ट्रक चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन कु. दिक्षा गजानन मेश्राम वय १९ वर्ष, हिचे सायकलला धडक मारुन तिला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी कु. देवकन्या श्रीकृष्ण नान्हे वय १९ वर्ष, रा. भावड यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३३७,३३८भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पो. स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**२) बस चालकांच्या निष्काळजीपणामुळे गाईचा मृत्यु . :—**

दिनांक २६/०९/२०१६ रोजी १८.०० ते १८.३० वा. दर. यातील अज्ञात आरोपी एसटी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, हयगयीने चालवुन भिलेवाडा कडुन भंडारा कडे जात असता फिर्यादीचे गाईला धडक दिल्याने गाय मरण पावुन अंदाजे कि. २५,०००/—रु. चे नुकसान केल्याने व आरोपीने अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी वासुदेव काशीराम माटे वय ५३ वर्ष, रा. कारधा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,४२९ भांदवि. सहकलम १८४,१३४/१८७(ब) मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो. स्टे. कारधा हे करीत आहेत.

**३) रेतीने भरलेला ट्रक भरधाव वेगाने चालवुन कट मारुन गेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २६/०९/२०१६ रोजी ९.४५ वा. दर. यातील फिर्यादी लोकसेवक असुन यांनी रेतीने भरलेल्या ट्रकचे चालकास ट्रक थांबविण्यास ईशारा केला असता यातील आरोपी ट्रक चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक न थांबविता इतरांचे जिवीतास धोका होईल असे भरधाव वेगाने चालवुन फिर्यादीचे वाहनास कट मारुन पळुन गेल्याने फिर्यादी धनजय यशवंत देशमुख वय ४६ वर्ष, रा. मोहाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९,३३६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पटले पो. स्टे. वरठी हे करीत आहेत.

**४) भांडण करुन डोक्यावर मारुन जखमी केले. :—**

दिनांक २६/०९/२०१६ रोजी १५.३० वा. दर. यातील फिर्यादीने लहान भावास तु टटेरी मनेरीचा दुकान घरासमोर अंगणात का लावला घरात येण्यास जाण्यास त्रास होत आहे. असे बोलले असता यातील आरोपीने भांडण करुन फिर्यादीस ढकलढुकल केले व लोखंडी सब्बलने फिर्यादीचे डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी शंकर रामकृष्ण देशमुख वय ३६ वर्ष, रा. लाखनी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :-

दिनांक २६/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ९१ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२ केसेस, तिन सिटर वाहनांवरती ०६ केसेस व ईतर वाहनांवरती ८३ केसेस करण्यात आलेल्या आहेत

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.